# नाविण्यपुर्ण योजना

- **परभणी जिल्हयातील 848 गावांचे अद्ययावत डिजीटल गाव नकाशे गाव पातळीवर उपलब्ध करून देणे बाबत.**

सर्व सामान्य शेतकऱ्यांना तसेच महसुल अधिकारी/कर्मचारी यांना हद्दनिश्चीती, अकृषिक साठी नकाशा, सर्वेक्षण इ. विविध कामांसाठी गाव नकाशाची आवश्यकता भासते. सध्या उपलब्ध असलेले गावनकाशे हे अत्यंत जीर्ण झाल्याने त्यांचा वापर करणे शक्य होत नसून त्यामुळे कामकाजात अडचण निर्माण होते. तसेच नकाशाअभावी शेतक-यांना शेताच्या हद्दीबाबत संभ्रम निर्माण होउन त्यातून वादविवाद, जमीनीविषयक तंटे, सार्वजनीक वापरातील रस्ते बंद होणे ई समस्या निर्माण होउन त्यातून गावांची शांतता भंग होते.

वरील अडचण लक्षात घेऊन परभणी जिल्हयातील 848 गावांसाठी नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत दोन प्रतीत नकाशे तयार करण्यात आले आहेत. सदरचे नकाशे Scale changing Alphabetic Numbering to each village map and multicolor printing on 80 GSM bilt RM080 paper With both side polycoating by 80Micron film चे आहेत. या कामासाठी नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत रू. 6.00 लक्ष निधीचा विनीयोग करण्यात आला आहे. सदरचे नकाशे संबंधीत तहसिल कार्यालय व तलाठी कार्यालय यांना वितरीत करण्यात आले आहेत.

या नकाशांचा वापर सू.ज.रा.अभियान अर्तगत अतिक्रमीत रस्ते खूले करण्यासाठी झालेला आहे.

# <u>गाव नमुना 7/12 अभिलेखाचे पुर्नलेखन विशेष मोहिम</u>

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 खंड 4 नुसार गाव नमुना सात-बारा अधिकार अभिलेख व पिकांची नोंद वही यांचा एकत्रित नमुना असून त्याचे दोन भाग आहेत. 1) वरचा भाग , जो व्यवहार्य: गावनमुना सहाची सुची आहे आणि (2) खालचा भाग,ज्यामध्ये पिके आणि पडीक जमीनी यांसह लागवडीची आकडेवारी देण्यात येते.

**<u>अधिकार अभिलेखाचे पुर्नलेखन.</u>**

10 वर्षाच्या पडीक जमीनीसह पिकांची आकडेवाडी लिहिण्याची तरतुद या नमुन्या केलेली असल्यामुळे , गावनमुना सातबारा दर दहा वर्षांनी लिहिण्याची तरतुद आहे.गावनमुना सातबाराचे पुर्नलेखन बाबत उपविभागीय अधिकारी किंवा उपजिल्हाधिकारी यांनी तपशीलवार कार्यवाही करण्याबाबत नमुद आहे.

जिल्हयातील अधिकार अभिलेख गावनमुना सातबारा अभिलेखामध्ये मोठयाप्रमाणावर नोंदी झाल्या मुळे अभिलेखातील नोंदी समजण्यास अवघड होत आहे. तसेच इतर अभिलेखाचे नोंदी रकान्यामध्ये सुध्दा मोठया प्रमाणात नोंदी झाल्यामुळे गावनमुना सातबाराचे पुर्नलेखन करणे आवश्यक झाले आहे.

परभणी जिल्हयातील सर्व तालुक्यांत 7/12अभिलेखांचे पुर्नलेखन करण्यासाठी विशेष अभियान राबविण्यांत येत असून,जिल्हयात एकूण 238 तलाठी सज्जे व 848 महसुली गावे असून, खातेदार संख्या 5,15,591 व 7/12 ची संख्या 347315आहे. अधिकारी अभिलेखाचे पुर्नलेखन करण्यासाठी 3,66,000 अक्षरी-तीन लाख सहासष्ट हजार गावनमुना 7/12 फॉर्मची (सुधारीत)शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद यांचेकडून छपाई करुन घेण्यात आलेल्या आहेत. सदरील कामासाठी श्री.प्रविण धरमकर , उपविभागीय अधिकारी परभणी यांना प्राधिकृत करण्यांत आलेले आहे.

शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद यांचेकडून छपाई करुन घेण्यात आलेल्या गावनमुना 7/12 चे फॉर्मस पुर्नलेखन करण्यासाठी खालील प्रमाणे तालुका निहाय वाटप करण्यात आलेले आहेत.

| अ क्रं | तालुका | वाटप करण्यात आलेल्या 7/12 फॉर्मची संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | परभणी | 60,000 | |
| 2 | पुर्णा | 22,500 | |
| 3 | पालम | 22,500 | |
| 4 | गंगाखेड | 22,500 | |
| 5 | सोनपेठ | 22,500 | |
| 6 | पाथरी | 30,000 | |
| 7 | सेलु | 40,000 | |
| 8 | मानवत | 30,000 | |
| 9 | जिंतुर | 50,000 | |
| | **एकुण** | **3,00,000** | |

वरील तालुक्यापैकी परभणी , पुर्णा, गंगाखेड , पालम, सोनपेठ या तालुक्यात काम सुरुवात करण्यांत आलेले आहे.

**फलश्रृती**

1.जून्या गांव नमूना 7/12 अभिलेखावरील अस्पष्ट नोंदी कमी होण्यांस मदत

2.झालेल्या बदलांच्या नोंदी स्पष्ट व पुढील 10 वर्षाच्या कालावधीत अद्यावत राहण्यांस मदत

3.स्पष्ट व अद्यावत असल्यामूळे जमीन विषयक तंटे कमी होण्यांस मदत.

***जिल्हाधिकारी कार्यालयांत ग्रंथालय व वाचनालय स्थापन***

जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचा-यांना त्यांचे दैनंदिन कामकाज पार पाडतांना विविध अधिनीयम /नियम यांचा सतत वापर करावा लागतो. आवश्यक अधिनियम /नियम यांची पूस्तके कर्मचा-यांकडे उपलब्ध नसतात त्यामूळे कामकाजाचा दर्जा खालावतो.

वरील बाबी लक्षांत घेता कर्मचा-यांना आवश्यक ते अधिनियम /नियम कार्यालयातच उपलब्ध होण्यासाठी ग्रंथालयाची निर्मीती करण्याची बाब समोर आली. परंतू याबाबी साठी अनुदान उपलब्ध नसल्याने जिल्हा नियोजन समिती अंर्तगत नाविण्यपुर्ण उपक्रमातून रु.50000/- यासाठी उपलब्ध करुन घेण्यांत आले व त्यातून महसूल, पूरवठा, फौजदारी, लेखा, निवडणूक, कूळ, इनाम, सिलींग, माहिती अधिकार ई.अनूशंगीक पुस्तकांची खरेदी करण्यांत आली. तसेच कर्मचा-यांना दैनंदिन बाबींची तसेच परिसराची माहिती होण्यासाठी वर्तमानपत्रे व मासिके उपलब्ध करण्यांत आली.

सदरील पूस्तकेवाचन करण्यासाठी प्रशस्त हॉल, कपाट, टेबल, खूर्ची उपलब्ध करुन वाचनालय कार्यान्वीत करण्यांत आले.